सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# भूमि अभिलेख विभाग
## सरळसेवा भरती २०२५

## प्रसिद्धीपत्रक

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता दिनांक ०१/१०/२०२५ रोजी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानुसार दि. ०१/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्विकृतीचे कामकाज करण्यात आलेले आहे.

वरील कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा (Computer Based Test) दिनांक १३/११/२०२५ व १४/११/२०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर  घेण्यात येणार आहे. परीक्षेबाबत वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.

| दिनांक | दि. १३/११/२०२५ | | दि. १४/११/२०२५ | |
|---|---|---|---|---|
| सत्र | सत्र - १ | सत्र - २ | सत्र - १ | सत्र - २ |
| विभाग | पुणे विभाग अमरावती विभाग | नाशिक विभाग व नागपुर विभाग | मुंबई (कोकण) विभाग | छ. संभाजीनगर विभाग |
| उमेदवारांसाठी रिपोर्टींगची वेळ | सकाळी ८.०० वा. | दुपारी १२.०० वा. | सकाळी ८.०० वा. | दुपारी १२.०० वा. |

परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक व उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्राबाबत विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://mahabhumi.gov.in)  लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

पात्र उमेदवाराने संबंधीत संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सुचनांनुसार प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याचे असून प्रवेशपत्रावर नमुद परीक्षा केंद्रावर उमेदवाराने दिलेल्या वेळेत उपस्थित राहून परीक्षा द्यावयाची आहे. परीक्षा केंद्र बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन पद्धतीने (Computer Based Test) परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराचे परीक्षा केंद्र हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हा, तालुका अथवा इतर ठिकाणी असू शकते. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

परीक्षा पद्धतीबाबतची सविस्तर माहिती पुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताची लिंक विभागाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

स्वा/- XXX

डॉ. सुहास दिवसे (भा.प्र.से.)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ), पुणे.

दि. ०४/११/२०२५